# सवित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

## महाराष्ट्र राज्यस्तरीय पात्रता चाचणी
## रविवार दि. १६ एप्रिल, २०१७

परीक्षेची वेळ :— पहिले सत्र (पेपर १) — सकाळी १०.०० ते दुपारी ११.१५
(पेपर २) — सकाळी ११.१५ ते दुपारी १२.३०
दुसरे सत्र (पेपर ३) — दुपारी २.०० ते दुपारी ४.३०

---

**विद्यार्थ्यांसाठी परीक्षेसंदर्भातील सूचना :**

१. परीक्षा सुरू होण्यापूर्वी ६० मिनिटे अगोदर परीक्षा कक्ष खुले केले जातील. परीक्षा सुरू झाल्यावर २० मिनिटानंतर उशिरा येणाऱ्या विद्यार्थ्यांना परीक्षा कक्षात प्रवेश दिला जाणार नाही.

२. आसनक्रमांका सहीत बैठक व्यवस्था प्रत्येक विद्यार्थ्याला उपलब्ध करून देण्यात येईल. **विद्यार्थ्यांनी आसन क्रमांक तपासूनच आपल्या आसन क्रमांकाप्रमाणे परीक्षेसाठी बसावयाचे आहे.**

३. विद्यार्थ्यांना देण्यात आलेल्या बुकलेटचे सील पहिल्या सत्रात सकाळी १०.०० वाजण्यापूर्वी व दुसऱ्या सत्रात दुपारी २.०० वाजण्यापूर्वी उघडता येणार नाही.

४. परीक्षेच्या पहिल्या सत्रात सकाळी १२.३० वाजेपर्यंत आणि दुसऱ्या सत्रात दुपारी ४.३० वाजेपर्यंत कोणत्याही विद्यार्थ्याला परीक्षा कक्षा बाहेर जाण्याची परवानगी देण्यात येणार नाही. तसेच प्रत्येक सत्राच्या शेवटच्या २० मिनिटांमध्ये कोणत्याही विद्यार्थ्यास स्वच्छतागृहामध्ये जाता येणार नाही.

५. आपणास ॲडमीट कार्डवरती उल्लेखिलेल्या विषयाचीच प्रश्नपत्रिका मिळेल. उत्तरपत्रिका सोडविण्यापूर्वी विद्यार्थ्यांनी प्रश्नपत्रिका संच (Test Booklet) आणि ओ.एम.आर. उत्तरपत्रिकेमध्ये दर्शविलेल्या ठिकाणी विद्यार्थ्याने त्याचा **आसन क्रमांक,** नाव, विषय व सांकेतांक लिहीणे तसेच प्रश्नपत्रिका संच (सांकेतांक) व विषय सांकेतांक व आसन क्रमांक उत्तरपत्रिकेत (OMR) योग्य ठिकाणी शेड करणे आवश्यक आहे. **अन्यथा उत्तरपत्रिका तपासली जाणार नाही व शून्य मार्कस् मिळतील.** तसेच त्यामध्ये नमूद करण्यात आलेल्या सूचना व्यवस्थितरीत्या वाचून घेणे आवश्यक आहे. तसेच देण्यात आलेले प्रश्नपत्रिका संच आणि ओ.एम.आर. उत्तरपत्रिका हे बरोबर असल्याची (उदा. पृष्ठ क्रमांक, प्रश्नांचा अनुक्रमांक, विषय, सांकेतांक क्रमांक आणि विद्यार्थ्याने निवडलेला विषय) खात्री करून घ्यावी. जर प्रश्नपत्रिका संच आणि ओ.एम.आर. उत्तरपत्रिका यामध्ये काही बदल असल्यास, त्याऐवजी दुसरी योग्य अशी उत्तरपत्रिका पर्यवेक्षकांकडून बदलून घ्यावी.